# नामजप : आधुनिक विज्ञान काय सांगते?

**बापट गुरुजी**

नामजपाच्या संकल्पामध्ये विलक्षण शक्ती असते. ही शक्ती पूर्णांशाने मिळवण्यासाठी नामजपाचा संकल्प करण्यामागील ज्ञान नीट समजावून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक विज्ञान, वेद, पुराणे तसेच ज्ञानाच्या उपलब्ध असणाऱ्या सर्व मार्गांचे अवलोकन करून त्यातील अटी समजावून घेतल्या पाहिजेत. नामजपाच्या संकल्पाविषयी साधकांच्या मनात का हीही संदिग्धता राहू नये याकरिता हे सर्व संदर्भ तपासणे आवश्यक आहे. मात्र हे सगळे संदर्भ तपासत असताना लक्षात असू द्यावे की, पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन हा श्रद्धेसाठी घातक असतो, कारण दूषित दृष्टीमुळे सर्व संदर्भच चुकीचे वाटू लागतात. सर्व पूर्वग्रह विसरून जाऊन जर अवलोकन केले तर लक्षात येईल की, जे निष्कर्ष हजारो वर्षांपूर्वी या देशात सांगितले गेले आहेत तेच आज आधुनिक विज्ञान सिद्ध करून दाखवत आहे. प्राचीन हिंदू संस्कृतीने सांगितलेल्या मंत्रांच्या व नामजपाच्या बाबतीतील आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेतील प्रकाशित झालेले संदर्भ आता आपण तपासणार आहोत.

**शब्द आणि संवेदना** – जेव्हा आपण नाम घेतो तेव्हा शरीरशास्त्राप्रमाणे मेंदूमध्ये काय काय प्रक्रिया घडतात यावर प्रकाश टाकणारे काही निष्कर्ष आधुनिक विज्ञानाच्या प्रयोगाद्वारे नोंदवले गेले आहेत. रशियातील स्मालेन्स्की नावाच्या प्रयोगशाळेतील नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांचे हे निष्कर्ष आहेत. रशियासारख्या साम्यवादी, नास्तिक देशाच्या प्रयोगशाळेतील हे निष्कर्ष असल्याने ते कोठल्याही पूर्वग्रहाशिवाय व परिपूर्ण संशोधनाअंतीच प्रकाशित झालेले असले पाहिजेत असे आपण गृहित धरायला हरकत नसावी.

या शास्त्रज्ञांनी शब्दांच्या मेंदूवर होणाऱ्या परिणामांची प्रक्रिया सांगितली आहे. समजा, नुकतेच अन्न खाणे सुरू केलेल्या एका लहान मुलाला चांगले फळ, उदाहरणार्थ उत्तम हापूस आंबा, आणून दिला आणि थोडासा पहिल्यांदा चिरून, बारीक फोड करून खायला दिला. नंतर त्याला दाखवले की, हे जे पिवळे धम्मक किंवा केशरी रंगाचे फळ आहे त्याला 'आंबा' असे म्हणतात. ते मूल आंबा खाते, त्याला आंबा गोड लागतो आणि आवडतो सुद्धा. काही दिवसांनी मुलासमोर आंबा हा शब्द उच्चारल्यानंतर काय काय प्रक्रिया होतात, त्या शास्त्रज्ञांनी नोंदवल्या आहेत. या प्रक्रियेचे चार अवस्थांमध्ये स्मालेन्स्की प्रयोगशाळेने वर्णन केले आहे. प्रथम मेंदूमध्ये ठसा पक्का होतो की आंबा नावाची अशी एक वस्तू आहे, जी गोड लागते आणि त्याचे एक चित्र मेंदूमध्ये तयार होते. दुसऱ्या अवस्थेत 'आंबा' असे उच्चारल्याबरोबर मेंदूत आधी निर्माण झालेला ठसा जागृत होतो आणि तिसऱ्या अवस्थेत आधीच्या आठवणींची उजळणी मेंदूमध्ये होते व पुन्हा प्रत्यक्ष आंबा न खातासुद्धा, आंबा खाल्ल्यावर झालेले सगळे परिणाम त्या मुलाचे शरीर अनुभवते, ती चव त्याच्या जिभेवर रेंगाळते.

आपल्या रोजच्या अनुभवातले दुसरे उदाहरण पहायचे झाले तर कल्पना करा की, झाडावरची छान गाभुळलेली चिंच आपण खातो आहोत. ही कल्पना केल्याबरोबर ज्याला चिंच आवडते त्याच्या तोंडाला पाणी सुटून चिंचेची आंबट चव त्याच्या जिभेवर काही क्षण का होईना रेंगाळल्याशिवाय रहात नाही. कदाचित त्या आंबट चवीमुळे शरीरावर जे शहारे येतात ते सुद्धा येतील. थोडक्यात म्हणजे तो मनुष्य त्या चिंचेशी व तिच्या चवीशी इतका एकरूप होऊ शकतो की, प्रत्यक्ष चिंच खाल्ली नाही, तरी शब्द व त्याच्या परिणामाशी झालेल्या एकरूपत्वामुळे, प्रत्यक्ष क्रियेसारखे सगळे परिणाम त्याच्या शरीरावर दृग्गोचर होताना आढळतात.

याचप्रकारे रागाच्या किंवा भयाच्या कल्पनांचा विचार सुद्धा आपण करू शकता. एखाद्या माणसाने आपले अपराध केलेले असतात आणि आपण त्याच्यावर भयंकर रागावलेले असतो. एकांतात आपण विचार करत बसता, त्या माणसाला

शाप देत असता, शिव्या देत असता. कदाचित दातओठही खात असाल. परंतु मनातल्या मनात घडणाऱ्या या प्रत्येक क्रियेचे परिणाम आपल्या शरीरावर होत असतात. आपले शरीर कंपायमान होत असते, रागाची सर्व शारीरिक लक्षणे आपल्यामध्ये दिसायला लागतात. हाच प्रकार रागाप्रमाणेच लोभ, मत्सर, द्वेष या सर्व बाबतीतही लागू होतो. यांचेही परिणाम शरीरावर होतात आणि त्या परिणामाचे मुख्य कारक आहेत शब्द! मग ते प्रत्यक्ष उच्चारलेले असोत वा मनात उच्चारलेले असोत, या शब्दांच्या प्रत्येक आवर्तनाबरोबर हे परिणाम पायाच्या नखांपासून अगदी डोक्याच्या केसांपर्यंत सर्व शरीरभर दिसतात. या संवेदना फक्त शब्दाच्या माध्यमातून सर्व शरीरभर पसरतात, यात अतिशयोक्ती काहीच नाही. किती वेळा आपण समाजामध्ये रागाने बेभान झालेली, थरथर कापणारी माणसे बघतो कारण रागाची संवेदना त्यावेळी त्यांच्या सर्व शरीरभर पसरलेली असते.

रशियात सोकोलोव नावाच्या शास्त्रज्ञाचा 'शब्द आणि संवेदना' या विषयावरील अजून एक प्रसिद्ध प्रयोग इथे उद्धृत करता येईल. त्याने प्रथम काही मुलांना एकत्र केले आणि त्यांच्या हाता-पायावर कुठेतरी बारीक टाचणी टोचली. अकस्मात टाचणी टोचल्यावर झालेल्या वेदनांमुळे शरीरभर परिणामस्वरूप ज्या काही प्रतिक्रिया घडल्या त्या सगळ्या नोंदवून ठेवल्या. या प्रयोगाच्या उत्तरार्धात त्याने त्याच मुलांना परत बोलावले आणि सांगितले की, 'हे बघा, आता तुम्हाला टाचणी टोचणार आहोत.' या मुलांच्या डोक्यात दहा मिनिटांपूर्वीचा सगळा अनुभव ताजा होता. टाचणी जोरात टोचल्यावर काय काय होते, काय वेदना होतात हे स्मरणात होते. प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारे टाचणी न टोचता जे काही परिणाम त्या मुलांच्या शरीरावर, मेंदूवर झाले ते सुद्धा संशोधकांनी नोंदवून ठेवले. यातून चमत्कारजन्य निष्कर्ष निघाले की, प्रत्यक्ष टाचणी टोचल्यावर मुलांच्या शरीरावर जे परिणाम घडले त्याच्यापेक्षा जास्त परिणाम शब्दांच्या नुसत्या उच्चारामुळे घडले!

इवान पावलोव नावाच्या नोबेल पारितोषिक विजेत्या रशियन शास्त्रज्ञाने कुत्र्यांवर केलेला प्रयोगसुद्धा जगप्रसिद्ध आहे. या प्रयोगात २५-३० पाळीव कुत्र्यांना एकत्र आणले गेले. त्यांना सलग काही दिवस अशी सवय लावली की, त्यांना विशिष्ट वेळेला एकत्र आणायचे आणि विशिष्ट शब्दांचे उच्चारण करून त्यांना त्यांचा दुपारचा आहार द्यायचा. असे सलग एकोणतीस दिवस केले गेले. तिसाव्या दिवशी मात्र नेहमीप्रमाणे कुत्र्यांना एकत्र आणले गेले आणि आहारापूर्वी उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांचे उच्चारण केले गेले पण आहार दिला नाही. आश्चर्य असे की, जे परिणाम सतत एकोणतीस दिवस या कुत्र्यांच्या पोटावर आणि शरीरावर या शब्दांमुळे आणि प्रत्यक्ष आहारामुळे होत होते, ते सर्व परिणाम आधीपेक्षाही जास्त प्रमाणात नुसत्या शब्दांनी, आहार न घेता सुद्धा, जसेच्या तसे नोंदवले गेले.

**नामाचे अनुकूल परिणाम** – आपण बघितले की, जशा मानवी संवेदना आंबा किंवा चिंचेसारख्या प्रत्यक्ष अनुभवातून जागृत होतात तशाच त्या शब्दांच्या माध्यमातूनही होतात. शब्दांबरोबर जर योग्य एकरूपत्व साधले गेले, तर ती चवसुद्धा पुन्हा अनुभवता येते. याचे कारण म्हणजे कोणतीही वस्तू आपण प्रथमत: शब्दांच्या माध्यमातून ओळखत असतो. शब्दांशिवाय वस्तूला ओळख नाही. किंबहुना शब्द आधी आणि वस्तू नंतर. श्रीरामांचं नावसुद्धा प्रत्यक्षात आधी आले आणि प्रभु रामचंद्रांचा अवतार नंतर झाला. वाल्या कोळी रामजन्माच्या अगोदरच 'मरा मरा' असे उफराटे नाव घेत उद्धरून गेला असे समर्थांनीही दासबोधात म्हटले आहे. रामजन्माआधीच वाल्या कोळ्याचा वाल्मीकी ऋषी झाला. थोडक्यात नाम हे अमर आहे, पूर्वी होते, आता आहे आणि पुढेही राहणार आहे. प्रतिमा किंवा ईश्वर हे सगळे नंतर, आधी 'नाम'! प्रत्यक्ष अवतारांपेक्षा त्यांचे नाम हे जास्त श्रेष्ठ आणि जास्त शक्तिदायक आहे.

यालाच जर विज्ञानाचे निकष लावून पाहिले तर जेव्हा एखादे नाम, उदाहरणार्थ 'ओम् नमो भगवते वासुदेवाय' असे घेतले जाते, तेव्हा संवेदनांची नेमकी काय प्रक्रिया घडते ते आपल्याला लक्षात येईल. या नामातून मूलत: ध्वनित होणारा अर्थ म्हणजे, 'वासुदेवरूपी शक्तीला माझा नमस्कार असो'. मग त्या शक्तीचे स्वरूप म्हणजे महाविष्णूचा अवतार समजा, श्री दत्तात्रेयांचा अवतार समजा किंवा साक्षात वैश्विक शक्तीचे रूप समजा. या नामातील अर्थाप्रमाणे खरोखरीच्या वंदनाचा ठसा जर मेंदूमध्ये निश्चित झाला, तर प्रत्येक नामागणिक हे अभिप्रेत असलेले वंदन आपोआप केले जाते. ज्याप्रमाणे चिंचेच्या उच्चारामुळे आंबट चव अनुभवास येते, तसाच हा प्रकार आहे.

ज्या माध्यमातून सर्व शरीरभर परिणाम होतात, ते शब्दांचे माध्यम मूलत: अत्यंत प्रभावी असल्यानेच आधुनिक विज्ञानातील हे प्रयोग यशस्वी होतात. त्यामुळे एखाद्या मनुष्याने जर मनामध्ये खूणगाठ बांधली की नामाचे उच्चारण करून 'ओम् नमो भगवते वासुदेवाय' या अथवा तत्सम

शब्दांचे वा शब्द समूहाचे उच्चारण करून माझ्या शरीरावर अनुकूल परिणाम निश्चित होईल. या नामरूपी वैश्विक शक्तीला मी पूर्णपणे शरणागत झालेलो आहे, असा दृढ विचार करून जर तसेच उच्चारण तो मनुष्य करत राहिला तर निश्चितपणे सर्व शरीरभर अनुकूल परिणाम होणारच. फक्त प्रत्येक उच्चारणावेळी नामावरील एकाग्रता आणि आपल्या सद्गुरूवरील पूर्ण श्रद्धा नितांत आवश्यक आहे. ही श्रद्धा ज्ञानपूर्वक असो किंवा नुसती श्रद्धा असो! वस्तुत: ज्ञान व्हायचे तेव्हा होतच असते. परंतु तोपर्यंत ज्ञान सांगणारा जो आहे, त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवली आणि या श्रद्धेच्या आश्रयाने जर या शब्दाचे उच्चारण करत गेलो, तर शब्दांच्या प्रभावी माध्यमामुळे सर्व काही साध्य होऊ शकते आणि मग या जीवनामध्ये अशक्य असे काहीच रहात नाही. यात चमत्काराचा भाग अजिबात नाही. अकस्मात एखादी घटना घडून येते, त्यावेळी जरी तो चमत्कार वाटला तरी तो चमत्कार नसतो. आपणच केलेल्या तपामुळे ते प्रत्यक्षात घडून आलेले असते. अशी घटना घडण्यामागे प्रेरणा मोठ्या असतात. शक्ती मोठी असते, चमत्कार असा काहीच नसतो. चमत्काराची व्याख्या फार सोपी आहे. 'चमत्कार म्हणजे दाखवणाऱ्याचे ज्ञान आणि पहाणाऱ्याचे अज्ञान!' जो हा चमत्कार दाखवतो त्याला पंचमहाभूतांच्या कोठल्या मिश्रणाने काय होतं, विश्वात कशा आधारे काय घडामोडी घडतात, याचे ज्ञान असते आणि जो ते बघतो तो अज्ञानी असतो, एवढाच फरक असतो.

**पूर्ण शरणागती आणि श्रद्धा** – जीवनयात्रेमध्ये नामाचा अनुकूल परिणाम साधायचा असेल, तर पहिली अट म्हणजे सद्गुरूसमोर पूर्ण शरणागती, ज्याला इंग्रजीमध्ये 'झीरो डॅंपिंग' असे म्हणतात. सद्गुरूंवर इतकी दृढ श्रद्धा असली पाहिजे की, त्यांच्या देहाच्या व्यापाराकडे सुद्धा लक्ष जाऊ नये अन्यथा श्रद्धा डळमळीत होण्याची शक्यता असते. सद्गुरूंच्या बाबतीत शंका घेतली की, शक्ती मिळण्याची क्रिया थांबते. याचे कारण विज्ञान असे सांगते की, शक्ती ही फक्त ९० अंशाच्या कोनामधूनच एकीकडून दुसरीकडे गमन करते. ९० अंश म्हणजे काटकोन, म्हणजे आपल्यासमोर उभे असलेले आपले सद्गुरु आणि खाली साष्टांग नमस्कार केलेले आपण स्वत:, यामुळे झालेला ९० अंशाचा काटकोन! हा ९० अंशाचा कोन फक्त शरीराचा होऊन उपयोगी नाही. हा कोन जर मनाने साधता आला तरच शक्ती मिळते अन्यथा शक्ती मिळत नाही. सद्गुरूसमोर जर मन वाकत नसेल तर नमस्कार घालूच नये, कारण त्याचा काही उपयोग नाही! मग अशा पूर्ण शरणागतीशिवाय कित्येक वर्षे जरी नामस्मरण करत राहिलो तरी काही उपयोग नाही, कारण अपेक्षित शक्ती मिळणारच नाही. शाळा कॉलेजमध्ये सुद्धा, जर विद्यार्थ्यांचा शिक्षकांवर विश्वास नसेल तर तो विद्यार्थी त्या शिक्षकाकडून मिळणारे ज्ञान ग्रहणच करू शकणार नाही. इथे तर जीवनाचा संदेश आपल्याला घ्यायचा असतो, जीवनाची कृतकृत्यता त्या सद्गुरूकडून साधायची असते आणि तिथेच जर विश्वास नसेल तर आपल्याला काही मिळू शकणार नाही.

भारतीय आध्यात्मिक क्षेत्रात 'श्रद्धा' नावाची जी संकल्पना सांगितली आहे, त्यालाही विज्ञानाचा आधार आहे. आधुनिक विज्ञानातल्या या प्रयोगाचे नाव आहे– रेझोनान्स! समगतीस्पंदन! वैज्ञानिकांच्या या प्रयोगातील निष्कर्षांची व्याप्ती फार प्रचंड असून ती आध्यात्मिक क्षेत्रातही, तशीच्या तशी लागू पडते. रेझोनान्सच्या या प्रयोगाचे मानस शास्त्रातील महत्त्व बहुदा आधुनिक वैज्ञानिकांनाही जाणवले नसावे. हा प्रयोग व त्याचे निष्कर्ष, त्यातील बारकाव्यांसह पुढे अवलोकन करूया.

**आध्यात्मिक शक्ती संक्रमणाचे विज्ञान: समगती स्पंदन**– आध्यात्मिक शक्तीच्या संक्रमणाचे काही नियम आहेत, काही अटी आहेत, त्या नियमावलीचे अवलोकन आपल्याला आधुनिक विज्ञानातल्या रेझोनान्सच्या प्रयोगाद्वारे करणे शक्य आहे. विज्ञानात रेझोनान्सच्या प्रयोगात एका बंद खोलीत एक लांबलचक आडवा धागा समान घेऊन त्या धाग्याला कमी अधिक उंचीचे आणि वस्तुमानाचे काही लंबक टांगले जातात. त्यातल्या ज्या लंबकाला आपण गती देतो, त्या लंबकाला विज्ञानात 'ड्रायव्हर' असे म्हणतात. या ड्रायव्हरला आपण गती दिल्यावर सर्व लंबक आंदोलने घेऊ लागतात. थोड्याच वेळात इतर सर्व लंबक थांबतात, पण पुन्हा कोणतीही बाह्य गती न देताही बाकीच्या लंबकांपैकी जो लंबक त्या ड्रायव्हरच्या समान उंचीवर आहे आणि समान वस्तुमानाचा आहे, त्या लंबकाला आपोआप गती मिळते. इतर कमी जास्त उंचीच्या लंबकांमध्येसुद्धा सूक्ष्म आंदोलने काही काळापुरती निर्माण होतात. परंतु दीर्घकाळ टिकणारी गती फक्त या एका लंबकालाच मिळते. या प्रयोगाचा उत्तरार्ध गमतीशीर आहे. हा ड्रायव्हर थोड्या वेळाने थांबतो आणि ज्याला गती मिळाली होती तो लंबक आणखी जोरात आंदोलने घ्यायला लागतो. त्या लंबकाची गती कमी कमी

...पान ४९ वर

फळ आहे आणि ज्ञानातूनच मोक्षाचा मार्ग खुला होतो.

हे सर्व श्रद्धेचे स्वरूप विवरण करून झाले पण याहीपुढे जाऊन आपण या श्रद्धेच्या मार्गात कोठे आहोत, आपली श्रद्धा कोणत्या स्वरूपाची आहे हे आत्मपरीक्षणाने जाणून घेणे आवश्यक आहे. कोणत्याच गोष्टीवर आपण श्रद्धा ठेवत नसू तर मनात नाना संशयच निर्माण होतील, विकल्प आणि अश्रद्धा यांनी मन भरून जाईल.

आजच्या समाजाची स्थिती अशीच आहे. सर्वत्र चिंता, अस्थिरता, निराशा, अविश्वास, खोटेपणा, मरगळ पसरलेली आहे. कोणासमोर उदात्त ध्येये नाहीत, आशा नाहीत, स्वप्ने नाहीत, सळसळणारे चैतन्य नाही. तृप्ती आणि समाधानाने तर माणसाचे नावच टाकले आहे. माणसे फक्त देहाचा, उद्याचा, स्वर्थाचा विचार करताना दिसतात. देहाच्या पलिकडे काही शक्ती आहे याची त्यांना जाणीवच नाही. अवतारी पुरुषांची, साधुसंतांची, कर्मवीरांची भूमी ती हीच का असा प्रश्न पडावा अशी आपल्या देशाची स्थिती झालेली आहे. अशी स्थिती हे अश्रद्धेचेच अपत्य आहे.

हे चित्र बदलण्यासाठी काय करावे लागेल? यासाठी सर्वत्र विश्वास पेरावा लागेल. सात्त्विक श्रद्धा रुजवली पाहिजे. देव आहे, तो पाहतो आहे, तो आपला योगक्षेम चालवतो, तो जे आपल्याला देतो ते आपल्या कल्याणाचेच असते ही भावना मनात घट्ट रुजली पाहिजे. भवसागर तरून जाणाऱ्या आपण सर्वांनी परमेश्वराचीच प्रतिकृति असलेल्या आपल्या सद्गुरूंना शरण गेले पाहिजे. त्यांचे बोट धरून त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालले पाहिजे. तर आपलेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे जीवन उजळून जाईल.

ज्या राष्ट्राच्या मागे सात्त्विक, तेजस्वी, उज्ज्वल श्रद्धेची प्रदीर्घ परंपरा उभी असते ते राष्ट्र कितीही संकटे आली तरी नष्ट होत नाही. उलट एखाद्या दीपशिखेप्रमाणे संपूर्ण जगाचे नेतृत्व करण्याचे आणि त्याला उन्नतीचा, ऐश्वर्याचा मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य बाळगतात हे लक्षात घेऊन प्रत्येकाने अशी श्रद्धा आपल्या मनात बाळगावी, जोपासावी आणि तिच्या आधाराने, सर्व विश्वाचे नेतृत्व करून त्याला सन्मार्गस्थ करावे हीच भगवच्चरणी प्रार्थना!

---

पान ४४ वरून... नामजप

होत आली की, त्याच्या आंदोलनांमुळे परत ड्रायव्हरला गती मिळते आणि पुन्हा कोणतीही बाह्य स्वरूपात गती न देताही हे चक्र असेच सुरू राहते.

अध्यात्मात या ड्रायव्हरलाच 'सद्गुरु' असे नामाभिधान आहे, कारण यांच्या नौकेमध्ये बसूनच मुक्तीच्या पैलतीरावर आपल्याला जायचं आहे. या अध्यात्मातल्या ड्रायव्हरच्या म्हणजे सद्गुरूंच्या विचारांशी जो एकरूप झाला आहे, त्यालाच फक्त गती मिळेल हा अध्यात्माचा नियम आहे. गती म्हणजे साक्षात शक्ती! कोणतीही गती शक्तीशिवाय असूच शकत नाही! सद्गुरूंनी एकदा का त्या नामरूपी शब्दाच्या माध्यमातून शिष्याला शक्ती दिली आणि शिष्याने ती शक्ती घेऊन नामजप सुरू केला की कालांतराने या नामजपामुळे आणखी शक्तीची निर्मिती होते. अधिक शक्तीची निर्मिती झाली की, ही शक्ती परत त्या सद्गुरुरूपी ड्रायव्हरसहित त्या ड्रायव्हरच्या समान उंचीवर असलेल्या हजारो लंबकांना म्हणजे शिष्यांनासुद्धा मिळते. हा चमत्कार नाही. विज्ञानामध्ये यालाच 'रेझोनान्स' असे म्हणतात. या रेझोनान्समुळे शक्तीचा प्रचंड प्रमाणात गुणाकार होतो. ही शक्ती कुठून येते, कशी निर्माण होते, गुणाकार कसा होतो या प्रश्नांची उत्तरे विज्ञानाला अजून शोधता आलेली नाहीत.

विज्ञानातील या प्रयोगात लंबकाला दीर्घ गती मिळण्याचे कालांतर काही सेकंदांचे असते. परंतु अध्यात्माच्या कार्यशाळेत हे कालांतर काही वर्षे किंवा काही जन्मही असू शकते. कारण ही गती घ्यायलासुद्धा एखाद्याला तेवढी वर्षे लागतात. या महत्त्वाच्या सिद्धांताला अटी दोनच आहेत, आपली उंची आणि वस्तुमान त्या ड्रायव्हरएवढे असले पाहिजे. म्हणजेच आपल्या सद्गुरूंशी आपल्याला सतत अनुसंधान साधता आले पाहिजे. तसेच सर्व लंबकांना जोडणारा जो समान आडवा धागा आहे, ज्याला आपण मूळ वैश्विक शक्ती म्हणू त्याच्याशी काटकोन झाला पाहिजे. म्हणजेच मनापासून शरणागती साधता आली पाहिजे.

शब्दरूपाने जेव्हा ईश्वरी शक्ती प्रकट होते तेव्हा त्याला नाम असे म्हणतात. संकल्पपूर्वक केलेल्या नामजपामुळे शक्तीची निर्मिती होत असते आणि हा संकल्प जर सामुदायिक नामजपाचा असेल तर शक्ती निर्मितीचे प्रमाण निश्चितच जास्त असते. विज्ञानातल्या या सिद्धांतांचे, प्रयोगांचे अवलोकन करून सामुहिक नामजप करण्याचा संकल्प जेव्हा आपण करू तेव्हा हजारो जणांना मुक्तीच्या पैलतीरावर घेऊन जाण्याची प्रचंड शक्ती आपोआप निर्माण होईल हे निश्चित.

(प. पू. सद्गुरु श्री. बापट गुरुजी यांनी ओम् सद्गुरु प्रतिष्ठान, बोरीवली येथे दिनांक ४ नोव्हेंबर २००४ रोजी दिलेल्या प्रवचनांवर आधारित)